**–नियमित दिवाणी मुकदमा क्र.६२/२०२२ मधील निशाणी ३७ खालील आदेश–**

**(रामचंद्र रामकृष्ण राणे व.८ वि. भरत बाबुराव परब व. २५)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार पंढरीनाथ बाबु परब यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये प्रस्तुत दाव्याचे कामी त्यांना सामील करुन त्यांची बाजु मांडण्याची परवानगी मिळावी याकरीता दाखल केला आहे.

०२. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत दाव्यात अर्जदार कायद्याने आवश्यक पक्षकार असताना सुध्दा वादीने त्यांना या दाव्यात पक्षकार केलेले नाही. अर्जदार हे दावा विषयक देवस्थान मधील पुर्वसत्तेच्या प्रमुख मानक–यांपैकी एक मानकरी असून ते प्रतिवादी क्र. ९ व १० यांचे वकलातील असून प्रतिवादी क्र. ९ हा त्यांचा सख्ख चुलत पुतण्या व प्रतिवादी क्र. १० हा त्यांचा सख्खा चुलत भाऊ आहे. त्यामुळे अर्जदार यांचा सदर दाव्यातील मिळकतीमध्ये हक्कसंबंध आहे. त्यांनी पुढे असे कथन केले की, प्रतिवादीना दावा विषयक देवस्थानकडे पुर्वसत्तेचा मान पिढयानपिढया असून तो प्राप्त झालेला आहे व सदरची वस्तुस्थिती वादी यांनी दाव्यात स्पष्टपणे कबुल केली आहे. अर्जदार हा प्रतिवादी यांचे वकलातील असल्याने त्यांना प्रतिवादी म्हणुन याकामी सामील करुन घ्यावे अन्यथा त्यांचे पैशाचे स्वरुपात भरुन न येणारे नुकसान होणारे आहे. सबब, त्यांना प्रतिवादी म्हणुन सामिल करुन घेणेत यावे व त्यांची कायदेशीर बाजु मांडण्याची संधी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३. प्रस्तुत अर्जास वादीने नि. ३८ येथे आपले म्हणणे देऊन सदर अर्जास प्रखर विरोध दर्शविला. त्यांनी असे कथन केले की, अर्जदार यांचा अर्ज कायद्याच्या कक्षेत नसून अपुर्ण माहितीच्या आधारे वादी यांना त्रास देण्याच्या हेतुने दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जदार यांचा दावाविषयक देवस्थानकडे कोणत्या स्वरुपाचा हक्क आहे हे समजुन येणारे नाही. तसेच, यापुर्वी दावाविषयक देवस्थान संदर्भात राणे व परब कुटुंबियामध्ये अनेक न्यायालयात वाद निर्माण झाले. त्यामुळे अर्जदार यांचा समावेश दिसून येत नाही. त्यामुळे अर्जदारविरुध्द वादी कोणतीही दाद मागत नसल्याने त्यांचा प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०४.** अर्ज व म्हणणे वाचून पाहीले. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार, यांनी दाखल केलेले नि. ४२ येथील लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. तसेच, अर्जदार, वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुतचा दावा वादी आणि प्रतिवादी यांचेविरुध्द गाव मौजे कुंदे येथील दावा विषयक देवस्थान कडे प्रमुख व मुख्य असा राजसत्तेचा हक्क व अधिकार राणे कुटुंबिय यांचा असून त्या संपुर्ण वर्षात साज–या केल्या जाणा–या प्रत्येक धार्मिक सण उत्सवाच्या वेळी प्रथम गणेश पुजन करण्याचा व उपरोक्त हक्क व अधिकार वादींना आहे अशी हक्कस्थापना होऊन मिळणेकरीता व प्रतिवादी विरुध्द कायम ताकिदीकरीता दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी प्रस्तुत दाव्याचे अनुषंगाने त्यांचा दाव्याशी प्रत्यक्ष संबंध आहे असे दर्शविणारा कोणताही प्रथमदर्शनी पुरावा याकामी हजर केलेला नाही. अर्जदार यांनी प्रतिवादी क्र. ९ व १० यांचेशी नाते दर्शविणारी वंशावळ त्यांच्या कथनाच्या पुष्ठयर्थ याकामी हजर केलेली नाही. त्यामुळे अर्जदार यांचे प्रतिवादीच्या नावातील साम्य वगळता प्रतिवादी क्र. ९, १० व अर्जदार यांचेतील नाते स्प्ष्ट होत नाही. प्रस्तुत अर्जाच्या अनुषंगाने, वादी तसेच प्रतिवादी यांनी दिलेल्या म्हणण्यानुसार अर्जदार यांचा प्रस्तुत दाव्याशी कोणताही हक्कसंबंध नाही असे कथन केलेले आहे. यावरुन, अर्जदार हे प्रस्तुत दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार (Proper or necessary parties) आहेत असे दिसून येत नाही. तसेच, त्यांनी प्रस्तुत दाव्यामध्ये त्यांचा हक्कसंबंध व हितसंबंध (Locus standi) प्रथमदर्शनी दाखवून दिलेला नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र नाही. माझे उपरोक्त विवेचनावरुन, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**–: आदेश :–**

अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.10.23 11:24:15 +0530

दिनांक– २२/१०/२०२४ (प.रा.ढोरे)

सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कुडाळ.